उन्नती संस्था

सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

# खबरबात

## एप्रिल ते जून २०२६









www.unnati-isec.org

# संस्थेबद्दल

## स्वप्न

**प्रत्येकाला शिक्षण, अभिव्यक्ती, सहभाग तसेच भाषा-संस्कृतीसह सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार मिळेल.**

## ध्येय

**मातृभाषा आधारित बहुभाषिकता दृष्टीकोनातून औपचारिक, अनौपचारिक व सहज शिक्षणाच्या संधी निर्माण करणे.**

## मूल्ये

**समानता , कार्यनिष्ठा**
**प्रामाणिकपणा, स्वामीत्व**

उन्नती ही स्वयंसेवी संस्था ११ वर्षांपासून प्रामुख्याने वंचित आणि सेवा-अभावित अशा आदिवासी समाजघटकांसाठी शिक्षण, युवा-विकास आणि समुदाय विकास या क्षेत्रामध्ये कार्य करते.

आम्ही शाळा, शिक्षक आणि स्वयंसेवी संस्थांशी (NGOs) सहयोग करीत शिक्षण गुणवत्ता सुधारण्यासाठी कार्य करतो.

<u>उन्नती चार प्रमुख कार्यक्रम राबवते:</u>
१) मातृभाषा आधारित बहुभाषिकता माध्यमातून साक्षरता व शिक्षण
२) शाळा वाचनालय कार्यक्रम,
३) गाव पातळीवरील वाचनालय उपक्रम,
४) आदिवासी किशोरवयीन मुलींसाठी नेतृत्व विकास कार्यक्रम.

हे सर्व उपक्रम महाराष्ट्रातील अकोट तालुका (अकोला जिल्हा) आणि शहापूर (ठाणे जिल्हा) येथे राबवले जातात.

# ठळक घडामोडी

शहापूर प्रकल्पातील शेणवे व बाबरे या आश्रम शाळांतील **विद्यार्थ्यांनी मे महीन्याच्या सुट्टीत आपापल्या गावात वाचनालय प्रकल्प चालवला.** यासाठी उन्नतीच्या लायब्ररीतील पुस्तके विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. संबंधीत पुस्तके निवडण्यासाठी दि. २१ एप्रिल २०२६ रोजी शाळांमधील सख्यांनी शाळेत पुस्तकांचे आकर्षक प्रदर्शन लावले होते. यामधूनच **विद्यार्थ्यांनी गावात देवघेव करण्याकरता विविध विषयांवरील एकूण २५० पुस्तके निवडली.**

वाचकांसोबत पुस्तकांची देवघेव घेताना पुस्तके जीर्ण झाल्यास वा गहाळ झाल्यास त्याच पुस्तकांची पुन्हा खरेदी करावी लागते. वाचकांच्या मागणीचा विचार करत अकोला येथील कार्यालयात गहाळ व जीर्ण झालेल्या **१२ नवीन पुस्तकांची खरेदी** करण्यात आली.



संस्थेच्या शहापूर प्रकल्पात दि. १० एप्रिल २०२६ रोजी **मुख्याध्यापक व शिक्षकांची सभा** आयोजित करण्यात आली. सभेमध्ये वर्षभर राबविण्यात आलेल्या वाचन, लेखन, कला, गटकार्य आणि खेळातून शिकण्याच्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. **विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व सहभाग वाढल्याचे शिक्षकांनी सभेत नमूद केले.** सभेत साक्षरता चाचणीचे निष्कर्ष, विज्ञान विषयक पुस्तकांची गरज, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्याचे उपाय तसेच 'आनंदी अंक वाटप ' व 'उन्नती वर्ग' याबाबत चर्चा करण्यात आली. पुढील शैक्षणिक वर्षासाठी सहकार्य व नियोजनाची दिशा निश्चित करण्यात आली.

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

# ठळक घडामोडी

दि. ७ मे २०२६ रोजी कुसुमकोट येथे मेळघाट परिषदेने आयोजित केलेल्या संवाद सत्रात उन्नती संस्थेचे कार्यकर्ते **तिकाराम व गोकुळ यांनी सहभाग नोंदविला**. यावेळी उन्नती संस्थेच्या विविध शैक्षणिक साहित्यांचे प्रदर्शन मांडण्यात आले. .

मार्च ते एप्रिल २०२६ या कालावधीत **उन्नती संस्थेचा वार्षिक आढावा** दोन टप्प्यांत पार पडला. या प्रक्रियेत वर्षभर राबविण्यात आलेल्या कार्यक्रम निहाय विविध उपक्रमांचा, साध्य झालेल्या उद्दिष्टांचा, आव्हानांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यासाठी दि. २४ मार्च ते ९ एप्रिल दरम्यान अंतर्गत, तर दि. **१३ ते १६ एप्रिल दरम्यान व्यवस्थापन मंडळासमोर कार्यक्रमनिहाय कामाचे सादरीकरण करण्यात आले.**

संस्थेच्या उन्हाळी प्रशिक्षणात काही विषयांसाठी **संघ सदस्यांनीच प्रशिक्षक म्हणून जबाबदारी** घेतली. यातील काही जण **अशी भूमिका आयुष्यात प्रथमच करीत होते.** असे असले तरीही, पक्की पूर्वतयारी करून आपल्या विषयाचे त्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने प्रशिक्षण दिले. ही संधी मिळाल्यामुळे त्यांचा उत्साह दुणावला व स्व-प्रतिमा उंचावली. सुभाष केदार, गायत्री लोणकर, शीतल तोडकर, भारती जाधव, भारती पडवळ, संतोष लोणकर या सर्वांचे खूप अभिनंदन.







याच काळात **उन्नती संस्थेचे ध्येय, स्वप्न, ब्रीदवाक्य व संस्थेची मूल्य यांची पुनर्तपासणी** होऊन त्यात आवश्यक ते बदल करण्यात आले. सर्वांच्या सहभागाने अत्यंत तगडी प्रक्रिया झाली, जी संस्थेचे सहकारी श्री इब्राहीम अफगाण यांनी संचालित केली. प्रत्येकाने उपस्थित केलेल्या प्रश्नांना मिळून उत्तरे शोधण्यासाठी, प्रत्येकाचे समाधान होण्यासाठी या प्रक्रियेला पुरेसा वेळ देण्यात आला. परिणामी, सर्व संघ समाधानी व आनंदी झाला.

# वंचितांचे शिक्षण - आव्हाने, जिद्द आणि परिवर्तनाच्या कथा

दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी ठाणे, मुंबई येथे वरील विषयाचे **वार्षिक संमेलन** उन्नती संस्थेने आयोजित केले होते. आदिवासी समाजाविषयी शहरी भागात विचारमंथन घडवून आणणे, संस्थेसोबत नवीन व्यक्ती, हितचिंतक आणि संभाव्य सहकाऱ्यांची जोडणी करणे हा या संमेलनाचा प्रमुख उद्देश होता.

या संमेलनाचे प्रमुख पाहुणे **पद्मश्री महेंद्र कुमार मिश्रा** होते. आदिवासी समाजाचे ज्ञान, संस्कृती आणि भाषिक विविधता जपण्याची आवश्यकता त्यांनी उपस्थितांसमोर प्रभावीपणे मांडली.

आदिवासी शिक्षण क्षेत्रात सखोल अनुभव असलेल्या कार्यकर्त्या **राजश्री तिखे** या अतिथींनी आदिवासी युवा समाजाच्या उच्च शिक्षणातील अनेकानेक अडथळ्यांची सविस्तर मांडणी करून उपस्थितांचे या ज्वलंत विषयाकडे लक्ष वेधले.

संमेलनादरम्यान अमरावती जिल्ह्यात मेळघाटातील मुलांच्या शिक्षणासाठी तसेच आदिवासी समाजाच्या पुनर्वसनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खोज व सदया संस्थेच्या अनुक्रमे **बंडू साने व प्रेमदया कासदेकर या कार्यकर्त्यांची मुलाखत घेण्यात आली.**

कोरकू भाषा संवर्धनासाठी केलेल्या असामान्य आणि प्रेरणादायी कार्यासाठी नवी तलई या तेल्हारा तालुक्यातील गावात राहणाऱ्या **अनिल घासकर या युवकाचा विशेष सन्मान करण्यात आला.**

**कार्यक्रमाची वैशिष्ट्ये**

- संस्थेच्या उपक्रमांची माहिती देणारी विविध दालने.
- समुदायात घडलेल्या सकारात्मक बदलांचे सादरीकरण.
- कार्यक्रमाची छायाचित्रे, प्रकाशने आणि साहित्याची प्रदर्शनी.
- प्रदर्शनीला विविध क्षेत्रातील व्यक्तींची भेट आणि शुभेच्छा.

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

# उन्नती संमेलन

## क्षणचित्रे- उन्नती वार्षिक संमेलन




















# क्षेत्र घडामोडी

## युवती सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत मेंटर व मुलींचे प्रशिक्षण



एप्रिल ते मे २०२६ या कालावधीत **युवती सक्षमीकरण (Learning Community)** कार्यक्रमांतर्गत उन्नती संस्थेच्या मेंटर व मुलीनी मुंबईस्थित वाचा संस्थेमार्फत आयोजित विविध प्रशिक्षणांमध्ये सहभाग घेतला.

दि. २७ ते २९ एप्रिल २०२६ दरम्यान तीन दिवसीय मेंटर प्रशिक्षणात उन्नती संस्थेच्या मेंटर म्हणून भूमिका बजावत असणाऱ्या आदिती व शितल यांनी सहभाग घेतला. **या प्रशिक्षणात पितृसत्ताक व्यवस्था, नेतृत्व विकास, मानसिक आरोग्य, सुरक्षितता व संरक्षण तसेच मेंटरची भूमिका व जबाबदाऱ्या या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.**



दि. ५ ते ६ मे २०२६ रोजी भाईंदर येथे आयोजित ‘रुबरू’ प्रशिक्षणात खिरकुंड बु. येथील एलसी गटातील **११ मुली त्यांच्या मेंटरसह सहभागी झाल्या**. यामध्ये जेंडर, नेतृत्व विकास, सुरक्षितता, गटकार्य आणि संवाद या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. विविध खेळ व उपक्रमांमुळे मुलींमध्ये उत्साह निर्माण होण्यास मदत झाली. दि. २९ व ३० मे २०२६ रोजी दुसऱ्या मेंटर प्रशिक्षणात उन्नती संस्थेच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. **या प्रशिक्षणात बाल संरक्षण धोरण, पॉक्सो कायदा, पितृसत्ताक व्यवस्था तसेच समुदायातील प्रश्न ओळखण्यासाठी कम्युनिटी मॅपिंग** या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

# भाषा ही मुलांच्या अनुभवांची, संस्कृतीची आणि ओळखीची वाहक





मेळघाटच्या डोंगर-दऱ्यांमध्ये शिक्षणाचा दिवा पेटवण्याचे काम सदया संस्था गेली तीन वर्षे सातत्याने करत आहे. मे २०२६ मध्ये संस्थेच्या या प्रवासाला तीन वर्षे पूर्ण झाली. या आनंददायी क्षणाचा उत्सव चिखलदरा तालुक्यातील पाटकहु या गावात साजरा करण्यात आला, ज्यात गावकरी, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि शिक्षण क्षेत्रात काम करणारे अनेक जण उपस्थित होते. **या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून उन्नती संस्थेच्या संचालक हेमांगी जोशी उपस्थित होत्या.**

आपल्या मनोगतात त्यांनी मुलांच्या भाषेचे महत्त्व सोप्या शब्दांत मांडले. त्या म्हणाल्या की, ‘प्रत्येक मुलाची भाषा ही त्याच्या अनुभवांची, संस्कृतीची आणि ओळखीची वाहक असते. मुलांच्या भाषेला शिक्षणात योग्य स्थान मिळाले तर त्यांचे शिकणे अधिक अर्थपूर्ण आणि आनंददायी होते. त्यामुळे **मुलांची भाषा जपणे, तिला अभिव्यक्त होण्यासाठी संधी देणे आणि शिक्षण प्रक्रियेत तिचा सन्मान राखणे ही शिक्षक आणि समाजाची महत्त्वाची जबाबदारी आहे’**. त्यांच्या या विचारांनी उपस्थितांना मुलांच्या मातृभाषेकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा दिली.

# क्षेत्र घडामोडी

## खोज संस्थेसाठी गाण्यांचे प्रशिक्षण



अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील खोज संस्थेने मुलांसाठीच्या गाण्यांचे प्रशिक्षण आयोजित केले होते. **या प्रशिक्षणात सुभाष केदार व तिकाराम बेलसरे या उन्नती संस्थेच्या सदस्यांनी साधन व्यक्ती** (Resource Persons) म्हणून उपस्थित राहून **कोरकू, मराठी आणि हिंदी अशा तीन भाषांमधील गाणी** रंजक व कृतियुक्त पद्धतीने शिकवली. यामध्ये खोज संस्थेच्या एकूण १८ सदस्यांनी अत्यंत उत्साहाने व सक्रियतेने सहभाग नोंदवला.

"कोरकू आणि मराठी दोन्ही भाषांमधील गाण्यांना एकच चाल (ट्यून) असल्यामुळे ती गुणगुणणे आणि लक्षात ठेवणे अतिशय सोपे गेले," अशी बोलकी प्रतिक्रिया उपस्थित सहभागींनी दिली. **एकूण १२ (६ कोरकू व ६ मराठी) गाण्यांचा प्रत्यक्ष सराव करून घेण्यात आला.**

**उपस्थितांना ही गाणी खूप आवडली.** "आम्ही ही गाणी गावातील सर्व मुलांसोबत दोन्ही भाषांमध्ये आवर्जून म्हणून घेऊ आणि त्यांच्याकडून सराव करून घेऊ," असा निर्धार सदस्यांनी यावेळी व्यक्त केला.

**मे व जून २०२६ या कालावधीत उन्नती संस्थेतील कार्यरत कार्यकर्त्यांची वार्षिक कार्यमूल्यांकन प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेद्वारे कार्यकर्त्यांच्या कामाचा आढावा घेऊन त्यांच्या क्षमता, प्रगती आणि पुढील विकासाच्या संधींवर चर्चा करण्यात आली.**

# कामाचा प्रभाव

## पुस्तक देवघेव उपक्रमातून फुललेली वाचन संस्कृती

अकोला येथे उन्नती संस्थेचे गाव वाचनालय प्रकल्प चालत असलेल्या खिरकुंड खुर्द येथील नंदा ढिगर या पुस्तक देवघेव उपक्रमाच्या नियमित वाचक आहेत. दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या नंदाताई आणि त्यांचे पती दोघांनाही वाचनाची विशेष आवड आहे. ते दर आठवड्याला पुस्तके घेऊन नियमित वाचन करतात. **विशेष म्हणजे त्यांची दीड वर्षांची मुलगीही पुस्तक निवडताना उत्साहाने सहभागी होते.**

गावमित्र पुस्तके घेऊन त्यांच्या घरी गेल्यावर नंदाताई आवडीने पुस्तके निवडतात. पुस्तक निवडताना विषय, आशय आणि उपयुक्तता यांचे निरीक्षण करतात तसेच आवडीच्या पुस्तकांची मागणीही करतात. **नंदाताई वाचलेल्या पुस्तकांमधील माहिती आणि विचारांवर कुटुंबीयांसोबत चर्चा करतात.**

पुस्तक देवघेव उपक्रमामुळे त्यांच्या कुटुंबात वाचनाची सवय दृढ झाली असून **पुस्तकांविषयीची आवड पुढील पिढीपर्यंत पोहोचत आहे.**



# वाचनालयातून साक्षरतेकडे

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये उन्नती संस्थेमार्फत शहापूर तालुक्यातील कोठारे, टाकी पठार, बाबरे आणि शेणवे येथील चार आदिवासी आश्रमशाळांमधील इयत्ता पाचवीच्या **विद्यार्थ्यांसाठी वाचनालयातून साक्षरता हा उपक्रम** राबविण्यात आला.

सुरुवातीला १६० विद्यार्थ्यांची प्री साक्षरता चाचणी घेण्यात आली. **त्यापैकी ११२ विद्यार्थ्यांची निवड करून वर्षभर गोष्टी, शब्दखेळ, वाचन आणि लेखनाच्या विविध उपक्रमांद्वारे सातत्याने काम करण्यात आले.**

वर्ष अखेरीस १०८ विद्यार्थ्यांची पोस्ट साक्षरता चाचणी घेण्यात आली. या चाचणीत विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेत सुधारणा दिसून आली. मुळाक्षरे आणि चौदाखडी स्तरावरील विद्यार्थी जोडाक्षरे व वाचन गटात पोहोचले, तर काहींनी पूर्ण वाचन स्तर गाठला. विशेषत टाकी पठार आणि शेणवे शाळांमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय प्रगती केली. **एकूण ७६ विद्यार्थ्यांची क्षमता वाढली.**

**या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, आत्मविश्वास आणि साक्षरता कौशल्य विकसित होत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.** पुढील वर्षी अधिकाधिक विद्यार्थ्यांना पूर्ण वाचन स्तरापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न राहील.



# युथ गटाच्या माध्यमातून गावागावांत वाचन चळवळीचा विस्तार








शहापूर तालुक्यातील बाबरे व शेणवे (कुल्हे) आश्रमशाळांमध्ये गेल्या २ ते ३ वर्षांपासून इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसोबत युथ गट उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमातून **विद्यार्थ्यांना गावामध्ये पुस्तक देवघेव प्रक्रिया कशी राबवायची याचे प्रशिक्षण दिले जाते.** दिवाळी व उन्हाळी सुट्टीमध्ये विद्यार्थी गावागावांत जाऊन वाचन चळवळ पुढे नेतात.

यावर्षी मे महिन्यात बाबरे व शेणवे शाळांमधील प्रत्येकी ५ अशा **एकूण १० गावांमध्ये पुस्तक देवघेव उपक्रम राबविण्यात आला.** प्रत्येक गावासाठी २५ पुस्तके देण्यात आली. दि. ५ व ७ मे २०२६ रोजी शाळासख्यांनी या गावांपैकी ९ गावांना भेटी देऊन मुलांनी देवघेव प्रक्रिया, नोंदी व गावकऱ्यांशी संवाद कसा साधला आहे याचे निरीक्षण केले. ज्या ठिकाणी आवश्यक होते तेथे प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले तसेच पुस्तक प्रदर्शन (डिस्प्ले) प्रभावीपणे लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

# संघ सक्षमीकरण

## कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षणे

यंदा एप्रिल ते जून २०२६ या कालावधी दरम्यान **एकूण २४ विषयांवर प्रशिक्षणे पार पडली.** यामध्ये अकोला आणि शहापूर संघातील एकूण २० संघ सदस्यांनी सहभाग घेतला.

त्यातील **७ प्रशिक्षणे ही बाहेरील संस्थेमार्फत झाली व त्यामध्ये संस्थेच्या ११ संघ सदस्यांनी सहभाग घेतला.** यामध्ये बहुभाषिकता, वाचनालय, लीडरशीप, शिक्षण या विषयांचा समावेश होता. ज्यासाठी कार्यकर्ते महाराष्ट्रासहीत, राजस्थान, मध्यप्रदेश आदि ठिकाणी गेले होते.

तर संस्थात्मक दृष्टीने आणि मूल्याधिष्ठित संस्था चालावी म्हणून **१७ विषयांवर अंतर्गत प्रशिक्षणे घेण्यात आली.** यामध्ये संस्थेचे उद्दिष्ट्य, मूल्ये, धोरणे, कार्यकर्त्यांचे आंतरसंबध, अहवाललेखन, स्वतःचा उत्कर्ष कसा करा यासोबतच एआय, कॅनवा, छायाचित्र कशी काढावीत याचीदेखील प्रशिक्षणे देण्यात आली. कर्जत येथील वनवासी कल्याण आश्रम आणि अमरावतील येथील डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी या संस्थेत ही प्रशिक्षणे झाली. **यामध्ये संघातली २० संघ सदस्यांनी सहभाग घेतला.**






उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

# देणगीसाठी...





## YOUR SUPPORT WILL HELP US GROW!

**A/C Name:** Unnati Institute for Social and Educational Change
**Bank:** Development Bank Singapore (DBS)
**Branch:** Thane
**A/C NO.:** 8752 0100 0000 6576
**IFS CODE:** DBSS0IN0752

**UPI पेमेंट करिता**

UNNATIINSTITU@DBS

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

**पत्ता-** उन्नती संस्था, २०१, निसर्ग कृपा,
सुयोग मंगल कार्यालयाजवळ,
टिळक नगर, डोंबिवली पूर्व, ४२१२०१

9892103371

unnati.isec@gmail.com

www.unnati-isec.org